ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded


2016-17

IMPACT FACTOR SJIS 2015 - 5.403

ISSN 2319-4766

SRJIS

# Issues of Farmers' Suicides in India : Past, Present and Future



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्राध्यापकाचे नाव व पेपरचे शीर्षक | पान. क्र. |
|---|---|---|
| 79 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक अभ्यास<br>*डॉ. बी. डी. इंगळे* | 277-280 |
| 80 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक अर्थशास्त्रीय अभ्यास<br>*डॉ. अनिल दि.वाडकर* | 281-285 |
| 81 | भारतीय शेतकऱ्याच्या आत्महत्येस जवाबदार घटक<br>*प्रा. कविता प्रल्हादराव हिरुळकर* | 286-290 |
| 82 | शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय : वाशिम जिल्ह्याच्या संदर्भात एक अध्ययन<br>*डॉ. एच. आर. तिवारी* | 291-295 |
| 83 | भारतातील भोतकऱ्याच्या आत्महत्येची वर्तमान,भुत व भविश्यातील समस्या<br>*प्रो.डॉ.अवथरे जयेश* | 296-300 |
| 84 | विदर्भातील जलसिंचनाची स्थिती आणि अडचणी<br>*माधव चोले* | 301-304 |
| 85 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यास्थितीचे अध्ययन<br>*डॉ. वन्ने मोहन भूजंगा* | 305-307 |
| 86 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची कारणे व उपाययोजना - एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. मारोती विठ्ठलराव भोसले* | 308-313 |
| 87 | मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या :आत्महत्या कारणे व उपाय<br>*Dr. Ashok P. Tiparse* | 314-318 |
| 88 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जवाबदार असणाऱ्या घटकांचा अभ्यास<br>*प्राचार्य डॉ. व्ही. एच. नागरे* | 319-321 |
| 89 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या-समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. चव्हाण एस.जी.* | 322-323 |
| 90 | भारतातील शेतकऱ्यांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना<br>*डॉ. तुकाराम वैजनाथराव पोवळे* | 324-328 |
| 91 | ग्रामीण अर्थव्यवस्था : कृषी उत्पादकता आणि शेतकऱ्याच्या आत्महत्या<br>*प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे* | 329-333 |


240

VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR

८७.

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या :आत्महत्या कारणे व उपाय

**Dr. Ashok P. Tiparse**

*Research Guide & Head of the Economics Department Degloor College Degloor Dist Nanded*

प्रस्तावना :-

सध्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय गंभीर व चिंतनीय सुध्दा बनला आहे. सध्या जागतिकीकरणाचे धोरण गतीमान बनवून विदेशी गुंतवणुक दारासाठी आर्थव्यवस्था खुली होतांना विदेशी संस्थात्मक गुंतवणुक दारामुळे सेनसेक्स वधारत असून दुसऱ्या बाजुला शेतकऱ्याच्या आत्महात्याचे प्रमाण वाढत आहेत. १९९१ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था ही संरक्षीत होती पण १९९१ नंतर आपली अर्थव्यवस्था मुक्त केली व परकिय गुंतवणुकीस चालना मिळाली भारतीय अर्थव्यवस्था क्रषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणुन ओळखली जाते. हरितक्रांती झाली अन्नधान्याचे उत्पादन ५० दशलक्ष टनावर २४० दशलक्ष टनापर्यत वाढले पण त्याची फळे शेतकऱ्यांच्या पदरी पडली नाही. हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरुन लक्षात येते.भारतात मागील कांही वर्षापासून पंजाब कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना,केरळ व महाराष्ट्र या राज्यात शेतक-यांच्या आत्महत्या या प्रश्नांनी उग्र स्वरुप धार केले आहे. महाराष्ट्रात विदर्भ विभागात हा प्रश्न अधिक तिव्रतेने पुढे आला आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे कोण कोणते कारणे आहेत. हे शोधून त्यावर उपाय सुचिविण्यासाठी या अभ्यासाचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे यावर गांभीर्याने विचारमंथन होऊन धोरणात्मक उपाययोजना आखण्याची गरज आहे.

अभ्यासाची उद्दीष्टे :-

१) मराठवाडयातील शेतकऱ्याच्या आत्महत्येची कारणे अभ्यासणे
२) राज्यनिहाय जिल्हयानुसारशेतकऱ्याच्या आत्महत्येचा अभ्यास करणे
३) मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचा अभ्यास करणे
४) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी संभाव्य उपायाची चर्चा करणे

अभ्यास पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना शासनाचे विविध अहवाल, मासिके, त्रेमासिक, साप्ताहिके, पुस्तके, वर्तमानपत्रे, इत्यादीमधुन दुय्यम स्तरुपाची सामग्रीचे संकलन केले आहे. इंटरनेटव्दारे काही सामग्री संकलित केली आहे. सन २०१० ते २०१५ या काळातील राज्यनिहाय मराठवाडयातील जिल्हानिहाय शेतकऱ्यांच्या अत्महत्येची आकडेवारी दिलेली असली तरी सन २०१५ मधील आकडेवारीच्या सहाय्याने मराठवाडयातील शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या प्रश्नाचे विश्लेषण केले आहे.

मराठवाड्यातील जिल्ह्यांची सामाजिक व कृषी क्षेत्रांची सद्य:स्थिती:-

१) मराठवाडयाचे भौगोलिक क्षेत्र ६४,५९० कि.मी. असुन महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक क्षेत्राची ते २१% आहे. तर मराठवाड्याची लोकसंख्या(२०११) १८७.३१लक्ष असुन ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येशी १६.११% आहे. औरंगाबाद वगळता इतर ७ जिल्ह्यात ग्रामीण जनतेचे प्रमाण ८०% आहे. शेती हा त्याचा उपजीवीकेचा प्रमुख व्यवसाय होय.
२) मराठवाड्यातील जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न राज्य सरासरीच्या ३०% ते ४०% कमी आहे. जालना जिल्ह्याचे तर ५०% कमी आहे. ग्रामीण दारिद्रयाचे प्रमाण मोठे आहे.
३) महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अहवालाप्रमाणे मराठवाड्यातील सर्व ८ जिल्हे "मानव विकास निर्देशांक" (Human Development Index) राज्य, सरासरीच्या खाली आहे. राज्या सरासरी ०.५८



241

असुन जालना जिल्ह्यात कमी म्हणजे ०.२७ आहे. "मानव दारिद्रय निर्देशांका" (Human Poverty Index) संदर्भात नांदेड जिल्हा महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यात शेवटचा आहे. मराठवाड्यातील इतर जिल्हेही तळाशी आहेत. यावरुन मराठवाड्याची सद्य आर्थिक व सामाजिक स्थिती लक्षात येईल.

४) केंद्र सरकारने सन १९९७ साली नेमलेल्या शर्मा समितीने. भारतातील १०० अति दरिद्री जिल्हे घोषित केले आहेत त्यात मराठवाड्यातील सर्व आठ जिल्हे समाविष्ठ केले आहेत.

शेतकरी आत्महत्येत वाढ:-

१९९५ पासुन National Crime Record Bureau हे शेतकरी आत्महत्येची नोंद ठेवते याचा अर्थ असा नाही की त्याआधी आत्महत्या होत नव्हत्या मात्र १९९० नंतर शेतकरी आत्महत्येची वाढती संख्या आणि प्रमाण यामुळे नोंदणी ठेवण्यास सुरुवात झाली.महाराष्ट्रात विदर्भ हे शेतकरी आत्महत्येचे केंद्र. मात्र मागील दोन वर्षामध्ये मराठवाड्यातील शेतकरी देखील आत्महत्या करतानां दिसत आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाच्या (National Crime Record Bureau-NCRB) अहवाला नुसार सन २०१५ मध्ये देशतील १२,६०२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या यातील केवळ २ टक्के शेतकरी मोठे शेतकरी या प्रवर्गाती तर ७२ टक्के शेतकरी हे छोटे शेतकरी आहेत, ज्याच्यांकडे २ हेक्टर पेक्षाही कमी भुमि आहे. आत्महत्या केलेल्यापैकी ८० टक्के शेतकरी कर्जबाजारी होते. शेतकरी व शेतमजुरांच्या सर्वाधिक आत्महत्या केवळ ७ राज्यात झाल्या असुन हे प्रमाण ८७.५ % आहे. ती राज्य पुढीलप्रमाणे

राज्यनिहाय शेतकरी आत्महत्या (२०१५) तक्त क्र. (१)

| राज्य | महाराष्ट्र | कर्नाटक | तेलंगाना | मध्यप्रदेश | छत्तीसगढ | आंधप्रदेश | तामिळनाडू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ४२९१ . | १५६९ | १४०० | १२९० | ९५४ | ९१६ | ६०६ | ११,०२६ |
| टक्केवारी | ३४.१ | १२.५ | ११.१ | १०.२ | ७.६ | ७.३ | ४.८ | ८७.५ |

महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक आत्महत्या नोदवल्या गेल्या आहेत.

जिवन संपविण्याची कारणे:- तक्ता क्र. (२)

| | |
|---|---|
| कौटुंबिक समस्या | ११.७% |
| शेतीविषयक समस्या | १९.५% |
| इतर | ३०.३% |
| कर्जबाजारीपणा | ३८.५% |

आत्महत्येतील शेतकरी व शेतमजुंराचे प्रमाण

| घटक | २०१४ | २०१५ | बदल % |
|---|---|---|---|
| शेतकरी | ५,६५० | ८,००७ | ४१.७ |
| शेतमजुर | ६,७१० | ४,५९५ | -३१.५ |
| एकुण | १२,३६० | १२,६०२ | २.० |

मराठवाड्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची वर्षनिहाय आकडेवारी : तक्ता क्र. (३)

| वर्ष | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|
| आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या | १९१ | १६९ | १९८ | २०७ | ५७४ | ९४५ |

वरील आकडेवारी काळजीपुर्वक पाहिल्यास गेल्या पाच ते सात वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झाल्याचे लक्षात येते.दरम्यान, दुष्काळग्रस्त शेवकऱ्यांसाठी ४५०० कोटी रुपयांची केल्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे.तसेच दुबार पेरणीसाठी १६०० रुपये देण्याचे आश्वासनही सरकारने दिले आहे. परंतु, हे आश्वासन केवळ पोकळच नव्हे वर फसवे असल्याचे शेतकरी सांगतात. कारण अद्याप शतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा झाला नाही.दरम्यान, राज्य सरकारने केद्राकडे ४००२ कोटी रुपयांची मागणी केली आहे.

सातत्याने पडणारा दुष्काळ आणि डोक्यावर चढणारा कर्जाचा बोजा यामुळे मराठवाड्यात शेतकऱ्याच्या आत्महत्येचे सत्रच सुरु आहे. चालू वर्षात मराठवाड्यात सुमारे ९४५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन,या वर्षातील हा उच्चांकी आकडा आहे. त्यामुळे संपुर्ण राज्याच्या तुलनेत मराठवाड्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्याक झाल्याचे समोर आले आहे. सत्ताबदल होऊन भजप प्रणीत फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतरही सुमारे एक हजार शेतकऱ्यानी मराठवाड्यात आत्महत्या केल्याचे विदारक चित्र आहे.



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

मराठवाड्यात गेली तीन वर्षे म्हणवा तसा पाऊसच पडला नाही. त्यामुळे येथील शेतकऱ्याला सातत्याने देष्काळाला तोंड द्यावे लागत आहे.मातीत घातलेले बियाणे मातीतच राहते. जनावरांना चारा नाही, अशा कुटुंबावर पोटाची खळगी भरण्यासाठी शहरात स्थलांतर करण्याची वेळ आली आहे. (शेततळी-बंधारे भरले,जलयुक्त शिवार याशस्वितेकडे) खरेतर शेतकऱ्याच्या आत्महत्येमुळे प्रश्न सुटन नाही. उलट होती त्यापेक्षा दारुन परिस्थीतीला आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटूंबाला सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतकऱ्याने हताश न होता. परिस्थितीचा सामना धर्योने करायला हवा. तसेच समाजातून नाम सारख अनेक संस्था उभा राहणे गरजेचे असल्याची भावना जनतेमधून व्यक्त होत आहे.

मराठवाड्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची जिल्हावार आकडेवारी

| जिल्हा | औरंगाबाद | जालना | परभणी | हिंगोली | नांदेड | बीड | लातूर | उस्मानाबाद | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची संख्या | १२० | ५८ | ७१ | ३२ | १६५ | २६० | ७८ | १४० | ९४५ |
| टक्केवारी | | | | | | | | | |

सन १९९७ ते २०१५ या कालावधीतील वर्तमानत्रे मासिके, साप्ताहिके व नियतकलिका मधील साहित्याचा आढावा घेतल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे पुढीलप्रमाणे दिसुन येतात.

१)**नैसगिक आपत्ती** :-पुर, अवर्षण, भुकंप, दुष्काळ, पिकावरील रागराई यामुळे उत्पन्न नष्ट झाले त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

२)**दारिद्र्य**:- शेतकरी मुळातच दारिद्र्याच्या दुष्टचक्रात जीवन जगतो. गरीब असल्यामुळे त्याच्या जीवनावर राजकीय, आर्थिक धोरणावर मोठा परिणाम घडुन येतो.

३)**सरकारी धोरण**:-स्वतंत्र प्राप्तीनंतर भारत सरकाने स्विकारलेले धोरण आजपर्यत राबवलेली नीती योजना यांच्या परिणामातुन शेतीची बिकट अवस्था झाली. १९९१ नंतर निर्याताभिमुख,मुक्त अर्थव्यवस्थेचे तत्व समोर ठेवुन सार्वजनिक क्षेत्रतील सरकारी गुंतवणुक कमी करीत शेतीला पुरक धोरण न ठेवता खाजगीकरणाचे तत्व पुढे रेटत राहिल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत.

**मराठवाड्यातील शेतकऱ्याची खालावत जाणारी आर्थिक परिस्थिती** :- महाराष्ट्र औद्योगिक दृष्ट्या आघाडीवर असला तरी शेतीक्षेत्राच्या बाबतीत पिछाडीवर आहे. आणि दिवसेंदिवस शेतीची स्थिती अधिकाधिक खालावत चाललेली आहे. शेतकऱ्याच्या मोठया प्रमाणावर होणाऱ्या आत्महत्या हे त्याचे फलित आहे. महाराष्ट्रातील, विशेषत: मराठवाडा, विदर्भ, खानदेश हे तीन भाग आजही मागासलेले भाग म्हणुन ओळखले जातात. उद्योगधंद्यांचा फारसा विकास नाही आणि शेतीची परिस्थिती विकट या स्थितीत तेथील शेतकऱ्यांची स्थिती गंभीर होऊन 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या'सुरु झालेल्या आहेत व त्यात वाढ होत आहे. गेल्या ३ वर्षात (२००४-०५-०६) मराठवाड्यात ४०० हुन अधिक शेतकऱ्यांनी, विदर्भात ९०२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. पी. साईनाथ यांनी केलेल्या अभ्यानुसार १९९७ ते २००८ या १२ वर्षाच्या कालावधीत भारतात एकुण १,९९,१३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. त्यातील ४१,४०४ शेतकरी महाराष्ट्रातील होते. विदर्भात झालेल्या आत्महत्या सर्वाधिक आहेत. या विभागात विभागीय उत्पन्नव कृषी क्षेत्राचा वाटा मोठा असणे, भूपृष्टीय सिंचन नगण्य असणे, एकुण सिंचणक्षमता कमी असणे, अवर्षणप्रवणता अधिक असणे, शेत जमिनीचा आकार अत्यंत लहान असणे, पतपुरवठ्याच्या पुरशा सोयी नसणे, अशा वैशिष्ट्यांनी युक्त महाराष्ट्रातील, विशेषत: विदर्भ उत्पदकता कमी असणे आणि दिवसेंदिवस त्यात घट होत जाणे हेय. शेतकऱ्याला मिळणारे अत्यंत कमी उत्पन्न त्याला जगणे असह्य करून सोडत आहे.

**मराठवाड्यातील जमीनधारक व लागवडीखलील जमीनीचे प्रमाण पुढीलप्रमाणे.तक्ता क्र. (५)**

| शेतीचा आकार (हेक्टर) | जमीनधारक % | कसलेली जमीन % |
|---|---|---|
| सीमांत (०-१) | २४.२० | ६ |
| लहान(१-२) | २२.२५ | २०.४ |
| मध्यम (२-१०) | ४१.११ | ६५.३ |
| मोठा(१०+) | १.४ | ८.३ |



243

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

ब)अल्प व मध्यमकालीन उपाययोजना:-

१) सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणे.

२)ठिबक सिंचन पध्दती सबसिडी अंमलात आणणे.

३) नाबार्डच्या साह्याने पाणलोट विकास कार्यक्रमाच्या जोडीने व्यापक प्रमाणावर विहिर खोदणे.

४) फलोत्पादनाला चालना देऊन शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविणे.

५) दर्जेदार बियाणे निर्मितीसाठी विशेष निधीची तरतुद करणे.

६) पशु संवर्धन, दुभती जनावरे वैरण तसेच मत्स्योद्योग आदि पूरक उद्योगास चालना देणे.

याशिवाय-

**१)किमान आधार किंमती:-** या केंद्र सरकारणे जाहीर केलेल्या MSP (Minimum Support Prices) प्रमाणे असाव्यात.

**२) पिकविमा :-** अत्याधिक पाऊस, आवर्षण यासारख्या नैसर्गिक आपत्तीपासुन शेतकऱ्याच्या उत्पन्नाचे संरक्षण करण्यासाठी पीक विमा योजना उपयुक्त आहे. मात्र त्यासाठी व्यक्तीगत स्तरावर नेमक्या पीक नुकसानीची मोजमाप करणारी सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे.

**३)कंत्राटी शेती:-**जगातील इतर देशाप्रमाणेच भारतातही कृषी व्यवसायात कंत्राटी शेती पध्दत आकारास येत आहे. या पध्दतीत शेतकरी व एखद्या खाजगी व बहुराष्ट्रीय निगमांमध्ये कायदेशीर करार होऊन शेतकऱ्यांची जमिनीवरील मालकी सुरक्षित ठेवुन कंत्राटव्दारा ठरविलेल्या प्रति हेक्टर रकमेला पिकांचे विपणन करण्याची व्यवस्था केली जाते.शेतीतील भांडवली खर्चाची जबाबदारी संबंधित कंपनी उचलत असल्यामुळे गुंतकणुकीच्या मुख्य दडपणातुन शेतकऱ्याची सुटका होते.

**४) सेंद्रिय शेती:-** बियाणे, खत, वीज, मजुरी व कीटकनाशके यासारख्या आदानांवरील वाढत्या खर्चामुळे शेतातुन मिळणारे निव्वळ उत्पन्न घटत आहे. तसेच भांडवल सघन शेती पध्दतीतुन होणारी जमिनीची हानी व दीर्घपल्ल्यात उत्पादनातील होणारी घट टाळयासाठी सेंद्रिय शेतीला चालना देणे आवश्यक आहे.

**५)महाराष्ट्र मानव विकास मिशन:-** महाराष्ट्र हे मिशन स्थापन झाले असुन त्याअंतर्गत राज्य सरासरीच्या अर्ध्याहून कमी मानव विकास सूचकांक असलेल्या १९ पैकी १२ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. अशा प्रदेशात दुग्धविकास, मत्स्योद्योग, रेशीम उत्पादन,शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन व लघुउद्योगांसारखे उपक्रम जे स्थानिक संसाधनांशी मेळ राखणारे असतील ते सुरू करून कृषीसंबंधी रोजगार संधी उपलब्ध करुण देणे आवश्यक आहे.

## सरांश :-

शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी निरनिराळे उपाय प्रभावीपणे योजण्याची गरज आहे. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळाले पाहिजे विपणन व्यवस्था भक्कम असली पाहिजे शेतकऱ्यांच्या आत्महत्येला त्यांच्या कर्जबाजारीपणामुळे प्रामुख्याने जबावदार आहे. शेतकऱ्यांचे दारीद्र पर्यायी रोजगाराचा अभाव शेतीचे पावसावरील अवलंबीत्व सावकारी कर्जाचा अवाजवी व्याजदर बँकाकडून कर्ज वसूलीसाठी आणला जाणारा दबाव ही सर्व कामे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतक-यांच्या कर्जबाजाराशी निगडीत आहे. एकंदर शेतऱ्याच्या वाढता कर्जबाजारीपणा व आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे शेती व शेतकरी हा विकासाचा केंद्र बिंदू झाल्याशिवाय शश्वत विकास साध्य होणार नाही

संदर्भ :-

*Economic & Political weekly Dec. 08-14,2007*
*Farmers Suicide in India, Shiva, Vandanand Kumar Jalees.2006*
*नरेंद्र लाजेवार शेतकऱ्याच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय*
*डॉ. देसाई डॉ भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था*
*अर्थबोध-मराठवाडा अर्थशास्त्र परिषद २००७*
*दै. लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स,सकाळ, अर्थसंवाद त्रैमासिक, मराठी अर्थशास्त्र परिषद*
*आकडेवारी सौजन्य-ABP माझा*
*महाराष्ट्र शासन,महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अर्थ व सांख्यिकी संचालनायल,नियोजन विभाग विविध अंक*



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded